जिल्हा परिषद, अमरावती
**वित्त विभाग,कॅम्प परिसर अमरावती ४४४६०३**
**कॅम्प रोड, अमरावती**

**ई-मेल-** cafozpamravati@gmail.com

**दुरध्वनी क्र.** 0721-2662937

**जा.क्र.जिपअ/वित्त/रो.पा/**४८४५/२०२४ **दिनांक:-** २७/०८/२०२४

प्रति,

व्यवस्थापक,

-----------------------------------

अमरावती

विषय : - १८१/ सहा महिण्याकरीता मुदत ठेवीचे व्याजाचे दर सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, १८१ दिवस / ६ महिण्याकरीता या कालावधीकरीता या कार्यालयाद्वारे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासकीय हस्तांतरीत योजनेमधुन खालील प्रमाणे निधी गुंतवणूक करावयाचा आहे. करीता आपल्या बॅकेद्वारे सिलबंद पाकीटामध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनामध्ये प्रत्यक्षात व्याजाचे दर सादर करण्यात यावे. सदरचे सिलबंद पाकीट दि. २९/०८/२०२४ वेळ ५.०० वाजे पर्यंत प्रत्यक्ष या कार्यालयात आणून देण्यात यावे. त्यानंतरचे कोणत्याही प्रकारचे बॅक दर स्विकारता येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | निधीचे नांव | गुंतवणूक करावयाची रक्कम | कालावधीकरीता |
|---|---|---|---|
| १. | शासकीय निधी | ५०,००,००,०००/- | १८१ दिवस / ६ महिण्याकरीता |
| | एकुण | ५०,००,००,०००/- | |
| | **अक्षरी – रुपये पन्नास कोटी फक्त.** | | |

**अटी व शर्ती –**

१. गुंतवणूक ही १८१ दिवस/ ६ महीने करीता करण्यात येत असुन त्यापूर्वी शासकीय निधीची आवश्यकता असल्यास व त्यामुळे मुदत ठेव मोडावी लागल्यास वरील गुंतवणूक दराने व्याज देय राहील व याबाबत बॅकेंकडुन कोणतेही शुल्क आकारणी करण्यात येणार नाही.

२. मुदत संपल्यावर देखील सदर रक्कम या कार्यालयाचे पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत सदर रक्कमेवर नमुद दरानेच व्याज दयावे लागेल.

३. सदर गुंतवणूक करण्यात आलेल्या निधीबाबत मुदतपूर्तीनंतर वरील अटी व शर्थीव्यतीरीक्त कोणताही निर्णय बॅकेस या कार्यालयाचे संम्मतीशीवाय घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४. सदर गुंतवणुक शासकीय असल्याने गुंतवणुकीमधुन कोणतेही आयकर (TDS) अथवा इतर कोणतेही शुल्क आकारण्यात येवू नये.

५. जिल्हा परिषद अमरावतीस **CSR** सुविधा पुरवावी लागेल.

६. सदर गुंतवणूकीबाबतचा अंतिम निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचा राहिल.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलीपी –

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीसं सविनय सादर.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती